# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# आविष्कार संशोधन स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी चांगले व्यासपीठ : संजीव चव्हाण

▲पाटण, दि. ११ : आविष्कार संशोधन स्पर्धा हे विद्यार्थ्यांसाठी चांगले व्यासपीठ आहे. संशोधन स्पर्धेमुळे नवनवीन कल्पनांना चालना मिळते. या स्पर्धेत सहभागी होऊन संशोधक विद्यार्थी नवनवीन विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण करतील, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले.

बी. डी. कॉलेजमध्ये आयोजित आविष्कार स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. यावेळी डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, डॉ. संदीप तडाखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संजीव चव्हाण म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढली पाहिजे. त्यामुळे त्यांना समाजाच्या अनेक समस्यांवर उत्तरे शोधण्याची सवय लागते. त्याचबरोबर जिज्ञासा वाढून संशोधन वृत्तीला चालना मिळते. स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना मिळणारे मार्गदर्शन खूप मोलाचे असेल.



मार्गदर्शन करताना संजीव चव्हाण, व्यासपीठावर डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, डॉ. संदीप तडाखे.

### डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

बी. डी. कॉलेजमधील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. गजानन पट्टेबहादूर यांनी वित्तीय बाजारपेठ व सेवा या पुस्तकाचे लेखन केले. हे पुस्तक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार बी. कॉम. भाग दोनसाठी उपयुक्त आहे. या पुस्तकाचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण व प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी संस्थेच्यावतीने व महाविद्यालयाच्यावतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

डॉ. एस. डी. पवार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा संशोधन स्पर्धा उपयुक्त ठरतात. महाविद्यालयात असे नवनवीन उपक्रम सुरू असतात. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागावी, त्यांच्यामध्ये कौशल्य आणि कल्पकता निर्माण होण्यासाठी तसेच संशोधन स्पर्धेसाठी विद्यार्थी तयार व्हावेत यासाठी महाविद्यालयस्तरावर आविष्कार स्पर्धा आयोजित करण्यात आल्याचे डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविकात सांगितले.

महाविद्यालयीन आविष्कार स्पर्धेमध्ये बी. ए., बी. कॉम, बी. सी. ए, बी. एस्सी, एम. ए. एम., एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी विविध विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण केले. यशस्वी स्पर्धकांना प्रा.डॉ. एच. व्ही. काटे व मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रो. डॉ. पी. जे. ऐवळे, प्रा. अनिल सुतार, डॉ. एस. एस. तडाखे, प्रा. डॉ. पी. डी. कांबळे, डॉ. एस. एस. कुंभार, डॉ. एल. जी. गनगे यांनी काम पहिले.

डॉ. सौ. एम. आर. सपकाळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एस. तडाखे यांनी आभार मानले. कार्यक्रमास बी. जे. रासकर, प्रा. विशाल कांबळे, प्रा. डॉ. संतोष पाटील, ग्रंथपाल अनिल पाटील, प्रा. सौ. सुषमा कुंभार तसेच बी. ए., बी. कॉम. बी. एस्सी.चे विद्यार्थी उपस्थित होते.